# कोविड 19 साठी लसीकरण

## लसीची भूमिका काय आहे? लस कशी मदत करतात?'

लसींमध्ये सहसा एखाद्या विशिष्ट विषाणूचा/ व्हायरसचा (अँटीजन) कमकुवत किंवा निष्क्रिय भाग असतो जो वास्तविक रोगाला शरीराच्या प्रतिसादासारखी प्रतिकारक प्रतिक्रिया (अँटीबॉडीज) तयार करण्यास कारणीभूत असतो,.

'लसीची कार्यक्षमता ही लस रोगाचा प्रतिबंध करण्यास सक्षम आहे की नाही आणि किती प्रमाणात सक्षम आहे ह्याच्या आधारावर परिभाषित केली जाते.

वैयक्तिक पातळीवर गंभीर आजार, रुग्णालयात दाखल होणे आणि मृत्यू ह्यांच्यावर नियंत्रण किंवा प्रतिबंध हे या लसीचे फायदे आहेत. सार्वजनिक आरोग्याच्या पातळीवर संक्रमण किंवा रोगाचा प्रसाररोखणे किंवा अवरोधित करणे हे फायदे आहेत. जेव्हा समाजातील पुरेसे लोक लसीकरण करतात, तेव्हां लसीकरणानंतर संसर्ग किंवा रोगाचा प्रसार होण्याचा धोका कमी होतो. या लसींमध्ये संसर्ग किंवा रोगाशी संबंधित जोखमी टाळून किंवा त्यांच्याशिवाय संरक्षणात्मक प्रतिकारशक्ती प्रदान करण्याची क्षमता आहे.

## भारतात कोणती लस उपलब्ध आहेत?

भारतात सध्या दोन लसी कोव्हीशील्ड (Covishield®, भारतीय सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाद्वारे निर्मित ॲस्ट्रॅजेनेका -AstraZeneca लस) आणि कोव्हॅक्सिन (Covaxin®, भारत बायोटेक लिमिटेड द्वारा निर्मित) ह्यांनापरवानगी दिलेली आहे. याव्यतिरिक्त, भारतात मे महिन्यात रशियाची स्पुतनिक व्ही कोविड -१९ लस त्याच्या स्थानिक वितरक डॉ. रेड्डीज लॅबोरेटरीजच्या माध्यमातून प्राप्त होईल.

## ही लस कोण घेऊ शकते?

18 वर्षांपेक्षा जास्त वय असलेली व्यक्ती ह्या लसीघेऊ शकतात. उच्च रक्तदाब, मधुमेह, दमा, फुफ्फुस, यकृत आणि मूत्रपिंडाचा रोग आणि दीर्घकालीन संसर्ग असलेल्या कोणत्याही प्रकारच्या पूर्व-विद्यमान परिस्थितीत असलेल्या लोकांसाठी देखील लस सुरक्षित आहेत.

ज्या व्यक्तींची शारीरिक प्रतिरक्षा प्रणाली विशिष्ट कारणामुळे आधीपासून प्रभावित झालेली आहे, कमकुवत आहे (कर्करोग किंवा इम्युनोसप्रेसन्ट औषधे), ज्यांना गंभीर ॲलर्जी चा पूर्वीपासून त्रास आहे किंवा एखादी व्यक्ती गर्भवती आहे तर त्यांनी आरोग्य सेवकाचा सल्ला घ्यावा. लसीचा मासिक पाळीवर परिणाम किंवा मासिक पाळीच्या दरम्यान घेतल्यास त्याच्या कमी प्रभावाबद्दल सध्या पुरावा नाही आहे.

**किती लसी घ्याव्या आणि केव्हा?**

लसचे दोन डोस घेतले पाहिजेत.कोविशिल्ड  च्या दोन डोसमधील अंतर ६–८ आठवडे आहे आणि कोव्हॅक्सिन आणि स्पुतनिकच्या दोन डोसांमधील अंतर ४ आठवडे आहे. हे शक्य आहे की एका वर्षा नंतर बूस्टरची आवश्यकता असू शकेल, परंतु सध्या यावर कोणतेही स्पष्टीकरण नाही.

**लसीकरणाचे  सामान्य दुष्परिणाम काय आहेत?**

काही लोकांना थोडा ताप, लस दिलेल्या जागी वेदना, अंग दुखी, डोकेदुखी आणि थकवा जाणवतो.

**या परिस्थितीत काय केले पाहिजे?**

पॅरासिटामॉल 500 मिलीग्राम टॅब्लेट दर 8 तासांनी 24 तासापर्यंत घ्यावी. हे औषध या प्रमाणात सुरक्षित आहे व औषधाच्या दुकानात काउंटरवर सहजरित्या मिऴते.

**लसीमुळे कोव्हीड -१९ हा आजार कोणाला होऊ शकतो का ?**

नाही, कोणत्याही लसी मधे  जिवंत व्हायरस नसतात. याचा अर्थ असा की लस आपल्याला कोविड १९ ने आजारी बनवू शकत नाही.

परंतु सहसा लसीकरणानंतर शरीरात प्रतिकारशक्ती तयार होण्यास काही आठवडे लागतात (कोविड १९ च्या विषाणूविरूद्ध संरक्षण). याचा अर्थ असा आहे की एखाद्या व्यक्तीस लसीकरणाच्या आधी किंवा ताबडतोब नंतरच्या कालावधीत संसर्ग होऊ शकतो. लसीकरण करण्यापूर्वी आणि नंतर शारीरिक अंतर ठेवणे, मास्क लावणे आणि हात धुणे यासारख्या सर्व सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. लसीकरण केंद्रात चांगल्या प्रकारे फिट होणार  मास्क आणि शारीरिक अंतर राखणे देखील आवश्यक आहे.

**लसीकरणामुळे आरटीपीसीआर (RT -PCR ) ची चाचणी पॉज़िटिव  होऊ शकते का?**

नाही, ही चाचणी नाकपुडीतील वास्तविक किंवा जिवंत विषाणू आणि संबंधित अनुवांशिक सामग्री वर अवलंबून असते.म्हणून ही लस ती चाचणी पॉज़िटिव  बनवू शकत नाही. चाचणी तेव्हा पॉज़िटिव होऊ शकते जेव्हा व्यक्ती  लस लागण्यापूर्वी काही दिवस आधी किंवा लस घेऊन त्याचा पूर्ण प्रभाव होण्या आधीच एखाद्या संक्रमित व्यक्तीच्या  संपर्कात येऊन  त्या व्यक्तीच्या नाकात व्हायरस आलेला असतो.

**लसी दिल्यानंतर कुणालाही संसर्ग होऊ शकतो?**

अभ्यासातून असे दिसून आले आहे की अशा प्रकारचे संक्रमण फारच दुर्मिळ आहे. आणि उद्‌भवल्यास ही लक्षणे सौम्य असतात किंवा नसतात. लसीकरण झालेल्या व्यक्तींमध्ये , लसीकरण न घेतलेल्या व्यक्तींपेक्षा कमी व्हायरल लोड असतोआणि म्हणूनच व्हायरस चे संक्रमण  होण्याची शक्यता कमी असते.

## जर एखादा व्यक्ती कोव्हीड -१९  आजारातुन बरा झाला असेल तर, त्याला अद्‌याप लसची गरज आहे का?

होय, कारण तो  व्यक्ती किती काळ संरक्षित  राहील  हे तज्ञांना अद्‌याप माहिती नाही. जरी तो व्यक्ती  बरा झाला असला तरी त्याला पुन्हा संसर्ग होण्याची शक्यता फारच कमी असते. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय कडून अश्या व्यक्तीं साठी रोगाच्या लक्षणेस प्रारंभ झाल्याच्या दिवसापासुन 6–8 आठवड्यांनंतर लस देण्याची शिफारस केली गेली आहे .

## गर्भधारणे दरम्यान लसी घेता येऊ शकतात का?

होय, उपलब्ध आकडेवारीवरून असे दिसतं की गर्भवती महिलांमध्ये कोविड –१९ ची लक्षणे गर्भवती नसलेल्या स्त्रियांपेक्षा गंभीर आजाराच्यारूपात दिसूनयेतात. म्हणून जर त्याव्यक्तीस आरोग्य  कर्मचाऱ्यांच्या सल्ल्यानुसार लस मिळू शकते तर तिने ती घ्यावी

## या लसींची किंमत किती आहे?

सरकारी केंद्रांवर लसी विनामूल्य किंवा मोफत आहेत. खाजगी केंद्रांवर लसीकरणासाठी पैसे घेऊ शकतात. ही किंमत सरकारने आणि खासगी सुविधांने घेतलेल्या निर्णयावर वर अवलंबून असेल.

## संदर्भ

https://www.mohfw.gov.in/covid_vaccination/vaccination/faqs.htmlhttps://www.who.int/news-room/q-a-detail/coronavirus-disease-(covid-19)-vaccines?adgroupsurvey={adgroupsurvey}&gclid=CjwKCAjwm7mEBhBsEiwA_of-THBDaN-Vu4cocZCo3mXsSsUu6drfVU9DQ_yym_TZq8XUKL9IJKf_pRoCKMEQAvD_BwEhttps://apnews.com/article/how-long-covid-19-vaccine-protection-last-49340b077e271a750ad804128dbb5f53

Developed by Dr. Suchitra Dalvie, Dr. Arvinder Nagpal and Dr. Alka Barua, CommonHealth Members